# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.
/फॅक्स २५६५६२३४ **Email : : ropune.dte@gmail.com**

---

<u>अत्यंत महत्वाचे</u>

जा.क्र. विकापु/विवि/प्रवेश-२०११-१२/ ९४६८ दिनांक : २८/०७/२०११

प्रति,

प्राचार्य,
शासकीय / शासकीय अनुदानित / विना अनुदानित
पदवी / पदविका अभियांत्रिकी / औषधनिर्माण शास्त्र /
वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी
पदव्यूत्तर पदवी व्यवस्थापन एम बी ए / एम सी ए संस्था

विषय : सामाजिक मागास विद्यार्थ्याकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची आकरणी न करण्याबाबत

संदर्भ : १) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/२०११/९२७ दिनांक १८/०२/२०११
२) या कार्यालयाचे पत्र क्र. विकापु/विवि/प्रवेश-२०११-१२/६२७७ दिनांक २२/०७/२०११

उपरोक्त विषयासंदर्भात या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व शासकीय / शासकीय अनुदानित / विना अनुदानित पदवी / पदविका अभियांत्रिकी / औषधनिर्माण शास्त्र / वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी/ पदव्यूत्तर पदवी व्यवस्थापन एम बी ए / एम सी ए संस्थाना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०११-१२ मध्ये व्यावसाईक अभ्यासक्रमांना **केंद्रीभुत प्रवेश प्रक्रिये मार्फत प्रवेश घेणा-या महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय प्रवर्गातून उमेदवारांकडून प्रवेश घेताना कोणतेही शिक्षण शुल्काची आकारणी करु नये. याबाबत या कार्यालयाने वरील संदर्भीय पत्र क्र २ अन्वये सर्व संस्थांना सूचित केले होते. तथापी ब-याच संस्था ज्या विद्यार्थ्यांकडे जात पडताळणी प्रमाणपत्र नाही अशा विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काची मागणी करीत आहेत. अशा सर्व संस्थांना कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांकडे जात पडताळणी प्रमाणपत्र नाही अशा विद्यार्थ्यांना सदरचे प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालयाने दिनांक ३०/११/२०११ पर्यत मुदत दिली असल्याने, अशा विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काच्या रकमेची मागणी न करता प्रवेश देण्यात यावेत.**

(डी. एन. शिंगाडे)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे